रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

मराठी विभाग २०२१-०२२

मराठी भाषा गौरव दिन दिनांक२/३/२०२२

अहवाल

दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस सर्वत्र मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्सहाने साजरा केला जातो. या भाषादिनाचे औचित्य साधून कविवर्य कुसमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी कलाशाखा प्रमुख डॉ भग्यश्री पुणतांबेकर व मराठी विभाग प्रमुख डॉ सिंधू आवळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करायचे असेल तर मराठी भाषेचा सर्वांनी जाणीवपूर्वक वापर केला पाहिजे आवश्यक त्या ठिकाणी जरूर इतर भाषा बोलली पाहिजे पण आपल्या मायबोली मराठी भाषेला विसरता कामा नये असे प्रतिपादन डॉ सिंधू आवळे यांनी केले.तर डॉ.पुणतांबेकर मॅडम यांनी बोलताना इंग्लिश अथवा पर भाषेतील शब्दांची सरमिसळ करून बोलू नये इतर भाषा आपण अवगत कराव्यात पण मराठी भाषाचे मोठेपण आपण जपले पाहिजे असे सांगितले. भाषादिनानिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते. या प्रश्प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या माध्यमातून भाषेविषयी जनजागृती होईल अशा प्रश्नांचा समावेश यामध्ये करण्यात आला. या स्पर्धेत ऐकूण १७० प्राध्यापक व विद्यार्थींनी सहभाग घेतला. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल साहेब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

मराठी विभाग प्रमुख

प्र. प्राचार्य